नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १११ | Issue - 111 | वार सोमवार दि. ८ सप्टेंबर २०२५ | Blow- Monday Date 8 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## आरक्षणावर आक्षेपांचे सावट; जीआर दुरुस्तीसाठी बैठक होणार

### शासन निर्णयात नवे काही नसल्याचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलन केल्यानंतर मराठा आरक्षणाबाबत 'हैदराबाद गॅझेटिअर' लागू करण्याचा शासन निर्णय झाला आहे. त्यानुसार सरसकट जात प्रमाणपत्र मिळणार नसल्याकडे अभ्यासकांनी लक्ष वेधले आहे. तसेच शासन निर्णयातील अडसर ठरणारे शब्द बदलून दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार या आठवड्यात उपसमितीची बैठक होणार आहे.

हैदराबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करणारा शासन आदेश मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर काढण्यात आला आहे. या शासन निर्णयावर अभ्यासक आणि संघटनांनी आक्षेप घेतले आहेत.

मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी चौकशी करून सक्षम प्राधिकाऱ्यास सहाय्य करण्याच्या दृष्टीने अहवाल देण्यासाठी गावपातळीवर ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी सदस्य असलेली समिती नेमली जाणार आहे. मराठा समाजातील भूधारक, भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईने शेती करणाऱ्या व्यक्तींकडे जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांना १३ ऑक्टोबर १९६७पूर्वी ते किंवा त्यांचे पूर्वज संबंधित स्थानिक क्षेत्रांमध्ये राहत असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. या प्रतिज्ञापत्राच्या आधारे सक्षम प्राधिकारी स्थानिक चौकशी करून खातरजमा करणार आहेत.



स्थानिक चौकशीमध्ये संबंधित जातीचा दावा करणाऱ्या व्यक्तीचे गावातील किंवा कुळातील नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास व ते कुणबी असल्याचे प्रतिज्ञापत्र देण्यास तयार असल्यास, तसे प्रतिज्ञापत्र घेऊन गावपातळीवरील स्थानिक समिती, वंशावळ समितीच्या सहाय्याने चौकशी करणार आहे.

या चौकशीनुसार सक्षम प्राधिकारी अर्जदारास कुणबी जातीचा दाखला देण्याबाबत निर्णय घेतील, असे आदेशात म्हटले आहे. ही प्रक्रिया क्लिष्ट असून गावपातळीवरील समिती किती सहकार्य करणार याकडे लक्ष वेधले आहे. हैदराबाद गॅझेटमधील संख्यात्मक कुणबी आजचे मराठा असल्याचे कसे सिद्ध करायचे असाही प्रश्न विचारला आहे.

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी जे पूर्वी निकष होते ते निकष या 'जीआर'मुळे कसे बदलणार आहेत आणि नवीन जीआर निघाल्यामुळे पहिल्यापेक्षा वेगळे काय होणार आहे, असे प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते डॉ. शिवानंद भानुसे यांनी उपस्थित केले आहेत. मराठा समाजातील व्यक्तीची कुणबी नोंद मिळाली नाही तर त्याच्या कुणबी नातेवाईकाच्या शपथपत्रावर त्याला कुणबी प्रमाणपत्र मिळेल का, शपथपत्रावर मिळालेले कुणबी प्रमाणपत्र जातवैधता समितीकडे वैध होईल का, असे प्रश्न भानुसे यांनी उपस्थित केले.

## १२ सप्टेंबरपासून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता

मुंबई : राज्याच्या काही भागात पाऊस सुरु आहे तर काही भागात पावसानं उघडीप दिली आहे. अनेक ठिकाणी पाऊस झाल्यानं नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत, धरणांच्या पाणीसाठ्यात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दरम्यान, पुढील पाच दिवस राज्यातील हवामान कसं असेल? याबाबतची माहिती हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे. पुढील पाच दिवस राज्यात उघडीप राहणार असल्याचे खुळे म्हणाले.

संपूर्ण मराठवाडा, खान्देश, नाशिक अहिल्यानगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर जिल्ह्यांत आजपासून पुढील पाच दिवस म्हणजे गुरुवार दिनांक ११ सप्टेंबर पर्यंत पावसाची काहीशी उघडीप मिळण्याची शक्यता जाणवते. मुंबईसह कोकणात व विदर्भात मात्र ही उघडीप परवा मंगळवार दिनांक ९ सप्टेंबरपासून जाणवेल असे खुळे म्हणाले. मुंबईसह संपूर्ण कोकण व मराठवाडा वगळता उर्वरित संपूर्ण विदर्भ, खान्देश व नाशिक अहिल्यानगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर अश्या २१ जिल्ह्यांत शुक्रवार दिनांक १२ सप्टेंबरपासून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता जाणवते. मुंबईसह संपूर्ण कोकण व मराठवाड्यातील १५ जिल्ह्यात मात्र ह्या दिवसात केवळ तुरळक ठिकाणी मध्यमच पावसाची शक्यता जाणवते.

राज्यातील काही भागात ढगाळ हवामान आणि किरकोळ भागात रिमझिम पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे. खास करून उत्तर महाराष्ट्र विभागात काही भागात पाऊस होईल इतर ठिकाणी किरकोळ हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. उद्यापासून राज्यातील बहुतांश भागात सूर्य प्रकाश मिळेल हवेची दिशा राज्यात काही भागात उत्तरे कडून होईल . पुढील काळात वातावरणात मोठे बदल सतत होत राहतील.

दरम्यान, गेल्या काही दिवसात राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस झाला आहे. अनेक ठिकाणी पूरस्थिती देखील निर्माण झाली होती. त्यामुळं शेती पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होत. विशेषत: मराठवाडा आणि विदर्बला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला होता. तसेच अनेक घरांचे देखील नुकसान झालं होते. अनेकांची जनावरे देखील दगावली होती. काही भागात जीवितहानी देखील झाली होती. दरम्यान, गेल्या चार ते पाच दिवसापासून राज्यात पावसाचा जोर कमी झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

## राज्य महोत्सवाच्या जल्लोषात गिरगाव चौपाटीवर मुख्यमंत्र्यांचा गणरायाला निरोप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे, त्या उत्सवाचा जल्लोष आज गिरगाव चौपाटीवर उच्चांक गाठताना दिसला. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उपस्थित राहून गणरायाला निरोप दिला. राज्य महोत्सवाच्या या उत्साहात गीरगाव चौपाटीवर विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगलप्रभात लोढा, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार अमित साटम, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त अमितकुमार सैनी तसेच हजारो भाविक यांची उपस्थिती होती. ढोल-ताशांच्या गजरात आणि गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात वातावरण भारावून गेले होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सभापती प्रा.राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी गणेश मूर्तींवर पुष्पवृष्टी करून गणरायांना निरोप दिला.

राज्यात दहा दिवसांचा गणेशोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पडल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लोकांनी हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला. बाप्पाच्या विसर्जनावेळी मनात थोडीशी खंत व दुःख होते, कारण दहा दिवसांनी बाप्पा आपल्याला सोडून जातात. पण याचबरोबर पुढच्या वर्षी ते परत येणार आहेत याचा आनंदही असतो, असे श्री.फडणवीस म्हणाले.

मुंबई, पुणे तसेच राज्यातील सर्व शहरांमध्ये, गावांमध्ये गणेशोत्सवाच्या मिरवणुका शांततेत व शिस्तीत पार पडल्या. पोलीस विभाग, महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासन यांनी केलेल्या व्यवस्थेमुळे हा उत्सव सुरळीत पार पडला. त्यांचे काम कौतुकास्पद आहे, असेही श्री.फडणवीस यांनी सांगितले.

गिरगाव चौपाटीवरील विसर्जन सोहळ्याला मुंबईकरांसोबत विविध मान्यवरांचीही उपस्थिती होती. मुंबई महानगरपालिका, पोलिस व स्वयंसेवकांच्या मदतीने विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली.

## लालबागच्या राजाचं विसर्जन, फटाक्यांची आतषबाजी करत भक्तांच्या जनसागराच्या साक्षीनं लाडक्या राजाला निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईतील लालबागच्या राजाच्या विसर्जन करण्यात आलं आहे. लालबागच्या राजाच्या मूर्तीची उत्तर आरती झाल्यानंतर मंडळाचे पदाधिकारी आणि अनंत अंबानी यांच्या उपस्थितीत अत्याधुनिक तराफा अरबी समुद्रात दोन ते तीन किलोमीटर आत गेल्यानंतर लालबागच्या राजाचं विसर्जन करण्यात आलं. अत्याधुनिक तराफ्यावरुन लालबागच्या राजाचं विसर्जन करण्यात आलं. लालबागच्या राजाची अखेरची झलक अनेकांनी त्यांच्या फोनमध्ये टिपली. तर, अनेकांनी गिरगाव चौपाटीवर प्रत्यक्ष उपस्थित राहून आणि एबीपी माझाच्या माध्यमातून प्रेक्षकांनी लालबागच्या राजाचं विसर्जन पाहिलं.



लालबागचा राजा आज सकाळी ८ वाजता गिरगाव चौपाटीवर दाखल झाला होता. त्यापूर्वीच अरबी समुद्राला भरती आल्यानं विसर्जनात अडथळा निर्माण झाला होता. भरती आणि ओहोटीची परिस्थिती निर्माण झाल्यानं विसर्जनाला साडे बारा ते तेरा तासांचा वेळ लागला. समुद्राला ओहोटी आल्यानंतर लालबागच्या राजाचा गणपती नव्या अत्याधुनिक तराफ्यावर साडे चार वाजता ठेवण्यात यश आलं होतं. लालबागच्या राजाच्या गणपतीच्या विसर्जनापूर्वीच्या उत्तर आरतीला उद्योजक अनंत अंबानी उपस्थित होते.

अरबी समुद्रात विसर्जनासाठी लालबागच्या राजाच्या गणपतीची मूर्ती घेऊन तराफा साडे आठच्या दरम्यान निघाला . या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविकांनी गर्दी केली आहे. दरवर्षी लालबागच्या राजाचं सकाळी साडे आठच्या दरम्यान विसर्जन होतं. मात्र, अरबी समुद्राला भरती आल्यानं गणपतीची मूर्ती नव्या तराफ्यावर ठेवण्यात अडचणी निर्माण झाल्या. ओहोटी सुरु झाल्यानंतर नव्या तराफ्यावर गणपतीची मूर्ती साडे चार वाजता ठेवण्यात आली. त्यानंतर पुन्हा एकदा दागिने आणि आभूषणं लालबागच्या राजाला घालण्यात आली. विसर्जनापूर्वीची उत्तर आरती अनंत अंबानी यांच्या उपस्थितीत पार पाडली.

लालबागच्या राजाच्या विसर्जनाला काल सुरुवात झाली तेव्हा ज्या प्रकारे गर्दी होती त्याच पद्धतीनं गणेशभक्त मोठ्या प्रमाणावर गिरगाव चौपाटीवर उपस्थित आहेत. अनंत चतुर्दशी म्हणजेच काल सकाळी १२ वाजता लालबागच्या राजाची विसर्जन मिरवणूक सुरु झाली होती. आज सकाळी साडे आठ वाजता लालबागचा राजा गिरगाव चौपाटीवर दाखल झाला. अखेर १२ तासानंतर रात्री साडे आठच्या सुमारास भरती पुन्हा सुरु झाल्यानं लालबागच्या राजाच्या विसर्जनाची प्रक्रिया पुन्हा सुरु करण्यात आली. बारा तासांचा वेळ झाला तरी लालबागच्या राजाच्या भक्तांचा गिरगाव चौपाटीवरील उत्साह मात्र कायम आहे.

गिरगाव चौपाटीवर लालबागच्या राज्याच्या अखेरचा निरोप देण्यासाठी गणेश भक्त मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. महापालिका, कोस्टगार्ड आणि मुंबई पोलीस दलानं तगडा बंदोबस्त या ठिकाणी ठेवला होता. या ठिकाणी गणेश भक्त देखील गिरगाव चौपाटीवर उपस्थित आहेत. लालबागच्या राजाच्या विसर्जनासाठी कोळी बांधव देखील उपस्थित आहेत. कोळी बांधवांकडून गेल्या २४ वर्षांपासून लालबागच्या राजाचं विसर्जन करण्यामध्ये मदत केली जाते.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे ओबीसींना आश्वासन

### आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी शासकीय जयंती सोहळा कार्यक्रम

## ओबीसी आरक्षणाला धक्का नाही, ज्यांच्या नोंदी आहेत त्यांनाच कुणबी प्रमाणपत्र मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : मराठा आरक्षण देताना आम्ही ओबीसींना कोणताही धक्का लावला नाही, मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र न देता ज्यांची कुणबी नोंद सापडली आहे त्यांनाच फक्त आरक्षणाचा लाभ मिळणार आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ओबीसी समाजाच्या विकासासाठी सरकार कटीबद्ध आहे. पुण्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची २३४ वी शासकीय जयंती सोहळा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी देवेंद्र फडणवीसांनी हे वक्तव्य केलं.

मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहणार नाही, ओबीसींच्या ताटातील काढून घेऊन सरसकट प्रमाणपत्र देणार नाही. काहीही झाले तर ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. ओबीसींकरता योजना करणारे हे सरकार आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमच्या सरकारची नीती पक्की आहे. एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही. इंग्रजांनी जे केलं ते आम्ही करणार नाही. मराठा आरक्षण देताना ओबीसींना धक्का लागणार नाही. मराठावाड्यात १९४८ पर्यंत इंग्रज राज्य नव्हते, तर निजाम राज्य होते. मराठवाड्याचे रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. आता ज्यांच्याकडे नोंद असेल त्याला प्रमाणपत्र दिले जाईल असे आपण सागितले आहे.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, ओबीसींना जोपर्यंत मुख्य प्रवाहात आणणार नाही त्यावर त्याचा विकास होणार नाही. ओबीसी विकास होईपर्यंत शिवकार्य पूर्ण होऊ शकत नाही. कोणीही मनात शंका घेऊ नका. उमाजी नाईक यांना मानाचा मुजरा करतो. दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या रामोशी समाजाचा संबंध हा प्रत्यक्ष श्रीराम याच्याशी आहे. रामोशी समाजाच्या राजाचे कार्य अतुलनीय आहे. शिवाजी महाराज याच्या स्वराज्यामध्ये बहिर्जी नाईक रामोशी हे महाराजाचा विश्वासू होते, गुप्तहेर होते. बहिर्जी नाईक हे तिसरा डोळा म्हणून काम करत होते.



देव देश धर्माच्या लढ्यात हा रामोशी समाज अग्रेसर होता. ब्रिटिशांना पहिला विरोध राजे उमाजी नाईक यांनी केला. त्यांनी सेना तयार करून इंग्रजांना पळवले. रॉबर्ट यांनी पत्र लिहिले का उमाजी नाईक शिवाजी महाराज झाले असते. उमाजी नाईक हे उत्तम प्रशासक होते, स्वतःच्या हाताने त्यांनी पत्र लिहिले आहेत.

उमाजी नाईक सापडले नसते पण फितुरी झाली. शुभराजे पण असेच पकडले गेले. राजे उमाजी नाईक यांना पकडून इंग्रजांनी फाशी दिली. पण समाजाची लढाई थांबली नाही. इंग्रजांनी गुन्हेगारी कायदा करून समाजाला गुन्हेगार ठरवले. यांना नाही दाबले तर राज्य करता येणार नाही हे माहिती होते. पण इतिहासाने या समाजाचा इतिहास कधीच पुढे येऊ दिला नाही,. जवळपास ८० वर्षे गुन्हेगारी म्हणून समाज मागे गेला, त्यांचा विकास नाही झाला. आता सरकारचा प्रयत्न आहे की त्यांना त्यांचा विकास शौर्य आठवण करून द्यायचा आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणायचं.

हा कार्यकम जयंती पुरता नाही, तुम्ही कोण आहे लक्षात आले पाहिजे. आता मागे राहता कामा नये. आता पुढे गेले पाहिजे. समाज पाठीमागे राहणार नाही यासाठी राजे उमाजी नाईक महामंडळ स्थापन केले. त्यामाध्यमातून १५ लाखांपर्यंत कर्ज द्या, दोन लाखांपर्यंत बिगर तारण कर्ज देण्यात येईल. हा समाज नोकरी देणारा झाला पाहिजे. महाज्योतीमधून स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## संपादकीय....

### आरक्षणावर आक्षेप

मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलन केल्यानंतर मराठा आरक्षणाबाबत 'हैदराबाद गॅझेटिअर' लागू करण्याचा शासन निर्णय झाला आहे. त्यानुसार सरसकट जात प्रमाणपत्र मिळणार नसल्याकडे अभ्यासकांनी लक्ष वेधले आहे. तसेच शासन निर्णयातील अडसर ठरणारे शब्द बदलून दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार या आठवड्यात उपसमितीची बैठक होणार आहे. हैदराबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करणारा शासन आदेश मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर काढण्यात आला आहे. या शासन निर्णयावर अभ्यासक आणि संघटनांनी आक्षेप घेतले आहेत. मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी चौकशी करून सक्षम प्राधिकाऱ्यास सहाय्य करण्याच्या दृष्टीने अहवाल देण्यासाठी गावपातळीवर ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी सदस्य असलेली समिती नेमली जाणार आहे. मराठा समाजातील भूधारक, भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईने शेती करणाऱ्या व्यक्तींकडे जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांना १३ ऑक्टोबर १९६७पूर्वी ते किंवा त्यांचे पूर्वज संबंधित स्थानिक क्षेत्रांमध्ये राहत असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. या प्रतिज्ञापत्राच्या आधारे सक्षम प्राधिकारी स्थानिक चौकशी करून खातरजमा करणार आहेत. स्थानिक चौकशीमध्ये संबंधित जातीचा दावा करणाऱ्या व्यक्तीचे गावातील किंवा कुळातील नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास व ते कुणबी असल्याचे प्रतिज्ञापत्र देण्यास तयार असल्यास, तसे प्रतिज्ञापत्र घेऊन गावपातळीवरील स्थानिक समिती, वंशावळ समितीच्या सहाय्याने चौकशी करणार आहे.

# जनांदोलनातून उदयास आलेले खंबीर नेतृत्व : राजाभाऊ ओव्हाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय दलित पँथरच्या माध्यमातून देशाचे सामाजिक न्याय व आधिकारीता राज्य मंत्री नामदार रामदासजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली जनांदोलनातून सबंध महाराष्ट्रात नव्हे तर भारतभर अनेक खंभीर नेते व कार्यकर्ते उदयास आलेले आहेत. त्या पैकीच धाराशिव जिल्ह्यातून उदयास आलेले रिपाइंचे खंभीर नेतृत्व म्हणजेच रिपाइं (आठवले)चे महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी मा.राजाभाऊ ओव्हाळ होय. ज्यांची ओळख रिपाइं (आठवले) पक्षाचा धाराशिव जिल्ह्यातील ढाण्या वाघ म्हणून आहे.

राजाभाऊ ओव्हाळ हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर) च्या नामांतर लढ्यात पँथरच्या वादळी आंदोलनात तावून सुलाखून निघालेला कार्यकर्ता होय.नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर नामांतर,झोपडपट्टी पुनर्वसन,गायराण जमिनीवरील अतिक्रमण नियमित करणे,भूमीक्ती आंदोलन, महागाई निर्देशांका नुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करणे,दलित मागासवर्गीयावर होणार्या अन्याय अत्याचार विरोधी आंदोलनासह विविध जिव्हाळ्याच्या प्रश्नावर वेळोवेळी आज तागायात आयोजित मोर्चे, निदर्शने आंदोलनात धाराशिव जिल्ह्याचे नेतृत्व त्यानी केले आहे करित आहेत.मध्यंतरीच्या कालखंडात उस्मानाबाद (धाराशिव) न.प.चे नगरसेवक म्हणून समाजाचे प्रतिनिधित्व करत असताना अनेक विकासात्मक कामे केली आहेत. विशेष म्हणजे धाराशिव शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या ठिकाणी त्यांचा पूर्णाकृती पुतळा बसवावा यासाठी कार्यकर्त्यासह संघर्ष करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभाराही पर्यंत शासनाकडे पाठपुरावा केला. हे त्यांचे अविस्मर्णीय कार्य आहे.



दलित पँथर ते रिपाइं असा एकनिष्ठ प्रवास त्यांचा चालू आहे.आपल्या उभ्या आयुष्यात तसूभरही इकडे तिकडे न करता एक नेतृत्व-एक पक्ष-एक झेंडा या त्रिसुत्रासी एक निष्ठ राहून नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वा खाली रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून सामाजिक,राजकीय चळवळीत सक्रिय आहेत.त्यांच्या एकनिष्ठ कार्याची दखल घेवून पक्ष श्रेष्ठीने त्यांची रिपाइंच्या महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी पदी निवड केली आहे.ही एक आभिनंदनिय बाबा आहे.आज दि.७ सप्टेंबर त्यांचा ६४ वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसा निमित्ताने त्यांना मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

एस.के. गायकवाड (मु.पो. वागदरी ता.तुळजापूर मो.न.९३७००४०२०३

(लेखक रिपब्लिकन चळवळीतील कार्यकर्ते आहेत)

# डिजिटल ब्लॅकमेलिंग: तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगातून उद्भवलेला नवा सामाजिक गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डिजिटल युग हे मानवी जीवनाला अभूतपूर्व वेग आणि सोय देणारं ठरलं आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया यामुळे जग एका क्लिकवर उपलब्ध झालं आहे. माहिती, संवाद, व्यवहार आणि मनोरंजनाच्या संधींनी आपले दैनंदिन जीवन बदलून टाकलं आहे. पण ज्या तंत्रज्ञानामुळे माणसाच्या हातात ज्ञान आणि शक्ती आली, त्याच तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून नवे प्रकारचे गुन्हे देखील जन्माला आले आहेत. त्यापैकीच एक गंभीर आणि धोकादायक प्रकार म्हणजे डिजिटल ब्लॅकमेलिंग.

डिजिटल ब्लॅकमेलिंग म्हणजे नेमकं काय? एखाद्या व्यक्तीची खासगी माहिती, फोटो, व्हिडिओ किंवा इतर संवेदनशील कागदपत्रे संगणक, मोबाईल किंवा इंटरनेटच्या माध्यमातून मिळवून ती माहिती सार्वजनिक करण्याची धमकी देणे आणि त्याबदल्यात पैसे उकळणे, लैंगिक शोषण करणे किंवा त्या व्यक्तीला सामाजिकदृष्ट्या बदनाम करणे, हा त्याचा मुख्य हेतू असतो. आधीच्या काळी ब्लॅकमेलिंग हे प्रत्यक्ष भेटून होत असे, पण आता ई-मेल, व्हॉट्सॲप, फेसबुक, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट अशा डिजिटल माध्यमांचा वापर करून तो अधिक वेगाने आणि सहज होतो आहे.

या गुन्ह्याची कारणे अनेक आहेत. लोक सोशल मीडियावर वैयक्तिक फोटो, लोकेशन, माहिती अगदी सहजपणे टाकतात. हीच माहिती कधीकधी गुन्हेगारांच्या हातात शस्त्र बनते. प्रेम संबंधांतून किंवा व्यावसायिक नात्यांतून मिळालेली खासगी माहिती नातं तुटल्यावर दबावासाठी वापरली जाते. याशिवाय हॅकिंग, फिशिंग अटॅक, बनावट वेबसाईट्स यांमधून ई-मेल किंवा सोशल मीडिया अकाउंट हॅक करून माहिती उचलली जाते. पैशांची उकळपट्टी हा प्रमुख हेतू असतो, पण काही वेळा प्रतिष्ठा भंग करणे, सूड घेणे किंवा शारीरिक नात्याचा दबाव आणणे हेसुद्धा कारण ठरते. त्यामुळे डिजिटल ब्लॅकमेलिंग केवळ आर्थिक गुन्हा राहत नाही तर मानसिक, शारीरिक आणि सामाजिक छळाचे साधन बनतो.

याचे परिणाम खूप गंभीर असतात. बळी ठरलेली व्यक्ती भीती, तणाव, नैराश्य, अपराधीपणाच्या भावनेने ग्रासली जाते. अनेकदा आत्महत्येच्या टोकापर्यंत परिस्थिती पोहोचते. कुटुंबाची प्रतिष्ठा धोक्यात येते, आपसी विश्वास डळमळतो. विद्यार्थ्यांचे शिक्षण बिघडते, नोकरीत किंवा व्यवसायात अडचणी येतात. समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि लोक ऑनलाईन संवाद टाळू लागतात. सर्वात मोठा धोका म्हणजे लोक गप्प बसतात. तक्रार न केल्यामुळे गुन्हेगारांचे धाडस वाढते आणि समाजात भीतीचे वातावरण निर्माण होते.

कायद्याच्या दृष्टीने हा गंभीर गुन्हा आहे. भारतात माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० आणि भारतीय दंड संहिता यांतर्गत अशा प्रकरणांवर कारवाईची तरतूद आहे. कलम ३५४, ३५४ड, ३८४, ५०६, ५०९ यांद्वारे दोषींना कारावास व दंड होऊ शकतो. सायबर पोलीस स्टेशनची स्थापना केली आहे. शासन वेळोवेळी सायबर सुरक्षा आणि जनजागृती मोहिमा राबवते. पण या सगळ्या कायद्यांचा खरा उपयोग तेव्हाच होईल जेव्हा बळी ठरलेली व्यक्ती धैर्याने पुढे येईल आणि तक्रार नोंदवेल.

खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. सोशल मीडियावर कोणतीही वैयक्तिक माहिती टाकताना विचारपूर्वक निर्णय घ्यावा. मजबूत पासवर्ड ठेवावा आणि वेळोवेळी बदलावा. दोन स्तरावरील सुरक्षा वापरावी. अनोळखी लिंक किंवा मेसेजपासून सावध राहावे. खासगी क्षणांचे फोटो किंवा व्हिडिओ मोबाईलमध्ये किंवा ऑनलाईन सेव्ह करण्याऐवजी ते टाळावेत. जर कोणी ब्लॅकमेल करत असेल तर गप्प बसण्याऐवजी ताबडतोब सायबर पोलीस ठाण्यात तक्रार करावी. कुटुंब व मित्रांनी बळी ठरलेल्या व्यक्तीला दोष न देता आधार द्यावा आणि धैर्याने लढायला मदत करावी.

समाजाची भूमिका येथे खूप महत्त्वाची ठरते. शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना इंटरनेट सेफ्टीबद्दल शिक्षण द्यावे. पालकांनी मुलांशी विश्वासाचे नाते ठेवून डिजिटल जगाचे धोके समजावून सांगावेत. माध्यमांनी अशा घटनांचे वृत्तांकन जबाबदारीने करावे. सामाजिक संस्थांनी कार्यशाळा, जनजागृती मोहीमा आयोजित कराव्यात. जर समाजाने एकत्रितपणे जबाबदारी घेतली तर हा गुन्हा थांबवणे शक्य आहे.

जागरूकतेसाठी काही घोषवाक्ये लक्षात ठेवावीत - डिजिटल युगात सजग राहा, ब्लॅकमेलिंगपासून स्वतःचा बचाव करा., ऑनलाईन सुरक्षितता हीच खरी जबाबदारी.

एकूणच पाहता, डिजिटल ब्लॅकमेलिंग हा तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगातून उद्भवलेला नवा सामाजिक गुन्हा आहे. यातून व्यक्तीचे जीवन उद्ध्वस्त होऊ शकते, कुटुंबाची प्रतिष्ठा धोक्यात येऊ शकते आणि समाजात भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होऊ शकते. म्हणूनच या गुन्ह्याला रोखण्यासाठी जागरूकता, कायदेशीर कारवाई, सुरक्षित इंटरनेट वापर आणि सामाजिक एकजूट ही चार महत्त्वाची पावले आवश्यक आहेत. तंत्रज्ञानाचे फायदे घेताना त्याचा धोका लक्षात ठेवणे, सजग राहणे आणि योग्य वेळी कायदेशीर मदत घेणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

बुलढाणा/जिल्हा प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नोव्हेंबर डिसेंबर मध्ये दैनिक भारत संग्राम आयोजित सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तसेच आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते स्व मधुकरराव खंडारे यांच्या स्मृति प्रित्यर्थ राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाणार असून , प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन मुख्य आयोजक सचिन खंडारे यांनी केले आहे, शैक्षणिक, साहित्य,कला, पत्रकारिता, युवा कार्यकर्ता, सामाजिक, क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींनी पासपोर्ट फोटोसह आपला प्रस्ताव खालील दिलेल्या व्हाट्सअप नंबर वर पाठवावा, किंवा खालील दिलेल्या पत्त्यावर पाठवावा, सदर प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख १५ ऑक्टोंबर आहे,

सचिन मधुकर खंडारे, मुक्काम पोस्ट शिंदी, साखर खेर्डा तालुका सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा पिन, ४४३२०२, व्हाट्सअप नंबर ८६५७२३१११९, या पत्त्यावर आपला प्रस्ताव पाठवावेत,

सदर पुरस्कार हा दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये साखरखेर्डा येथील अनिकेत सैनिक स्कूलमध्ये आयोजित कार्यक्रमांमध्ये वितरित केले जाणार आहे, पुरस्काराचे स्वरूप पुढीलप्रमाणे, आकर्षक ट्रॉफी मेडल, सन्मानपत्र, गुलाब पुष्प, शाल, फेटा, बॅच, असणार असून पात्र असलेल्यांनी प्रस्ताव पाठवावेत, सदर पाठवलेल्या प्रस्तावासाठी पाच समितीचे सदस्य निर्णय घेणार आहे,

यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक किसन पिसे विकास सुखदाने, अँड वर्षाताई कंकाळ, गणेश चव्हाण , समाधान सरकटे, राहुल साबळे,यांचा निवड समितीमध्ये समावेश असणार आहे, यामध्ये साहित्यिक विकास सुखदाने, शेतकरी अभ्यासक किसन पिसे, अँड वर्षाताई कंकाळ, गणेश चव्हाण, समाधान सरकटे, अशी सुद्धा माहिती मुख्य आयोजक सचिन खंडारे यांनी दिली आहे .

# एमआयटी जूनियर कॉलेज वाखरीच्या विद्यार्थ्यांचे टेबल टेनिसमध्ये सुयश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा खेडा अधिकारी कार्यालय सोलापूर द्वारा आयोजित जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेत एमआयटी जुनिअर कॉलेज वाखरी तालुका पंढरपूर विद्यार्थ्यांनी १९ वर्ष वयोगटात तृतीय क्रमांक मिळवून पहिल्यांदाच टेबल टेनिस या क्रीडा प्रकारात आपल्या कॉलेजचे नाव उज्वल केले.

# टाकळीवाडीच्या जय हनुमान गणेशउत्सव मंडळ लहान कीर्ती महान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जय हनुमान गणेशोत्सव मंडळ स्थापना १९९८ यावर्षी झाली.

गावातील सगळ्यात लहान गणेश उत्सव मंडळ म्हणून आळख आहे. मंडळ सदस्या फक्त १० आहे. सदस्य जरी कमी असली तरी संपूर्ण गावाला गणेशोत्सव काळामध्ये महाप्रसादाची सोय करतात. हे वैशिष्ट्य आहे.

मंडळ लहान कीर्ती महान म्हणून या मंडळाकडे पाहिलं जातं. अनेक वेळा गणेश विसर्जना वेळी डॉल्बीला फाटा देऊन भजन स्वरूपात



गणपती बाप्पा निरोप दिला जातो. छोटे-मोठे सांस्कृतिक कार्यक्रम अनेक या मंडळातील लहान बालके करत असतात हे वैशिष्ट्य आहे.

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी पारंपारिक पद्धतीने साजरा केला बैलपोळा सण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : शेतकऱ्यांचा लाडका सण असलेला बैलपोळा आज संबंध सांगोला तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सणानिमित्त सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी पारंपारिक पद्धतीने बैलपोळा साजरा केला. शेतकऱ्यांचे बैलांप्रती असलेले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या सणात आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सहभाग घेऊन ग्रामीण संस्कृतीचे जतन करण्याचा संदेश दिला.



बैलपोळा हा महाराष्ट्रातील शेतकरी समुदायासाठी अतिशय महत्त्वाचा सण आहे. हा सण श्रावण अमावस्येला, म्हणजेच पिठोरी अमावस्येला साजरा केला जातो. यंदा हा सण २२ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहाने साजरा झाला. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी अचकदाणी गावातील शेतकऱ्यांसोबत एकत्र येऊन हा सण पारंपारिक पद्धतीने साजरा केला. बैलांच्या शिंगांना तेल आणि हळद लावून, त्यांच्या गळ्यात घुंगरांच्या माळा, रंगीबेरंगी फिती आणि फुलांच्या माला घालण्यात आल्या. त्यांच्या पाठीवर सुंदर नक्षीकाम केलेली झूल टाकण्यात आली, तर पायांना तोडे घालून त्यांना सजवण्यात आले. या सजावटीमुळे बैलांचा आकर्षक आणि उत्सवमय देखावा निर्माण झाला. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी स्वतः बैलांची पूजा करून त्यांना पुरणपोळी, वडे आणि कढीचा नैवेद्य दाखवला. यावेळी त्यांनी बैलांना गोडधोड खाऊ घालून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. बैल हा शेतकऱ्याचा खरा मित्र आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या या मूक प्राण्यांबद्दल आपण आदर आणि प्रेम व्यक्त करायलाच हवे, असे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी यावेळी बोलताना सांगितले. त्यांनी शेतकऱ्यांच्या कष्टाचे आणि बैलांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. या सणाद्वारे शेतकरी आणि बैल यांच्यातील अतूट नाते साजरे केले जाते, असेही ते म्हणाले.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी यावेळी शेतकऱ्यांच्या समस्या आणि आव्हानांवरही भाष्य केले. आधुनिक यांत्रिकीकरणामुळे बैलांचा वापर कमी होत असला, तरी ग्रामीण संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी शेतकऱ्यांना शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे रक्षण करण्याचे आवाहन केले.

हा सण केवळ शेतकऱ्यांचाच नव्हे, तर संपूर्ण समाजाचा एकता आणि बंधुभाव वाढवणारा आहे. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या सहभागाने शेतकरी वर्गामध्ये उत्साह वाढला आणि पारंपारिक सणांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

# करमाळ्यात कमला भवानी मंदिरासमोर आयपीएस अंजना कृष्णा यांच्या फोटोला खूपसे पाटलाच्या वतीने दुग्ध अभिषेक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

कुर्डू तालुका माढा येथे बेकायदेशीर अवैधरीत्या मुरूम चा होत असलेली खबर लागल्यानंतर आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा या त्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी गेले असता तेथील काही गाव गुंडाने पेढा टाकला आणि राज्याची उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना फोन लावून दिला व अजित दादा चे त्यांच्या गुंडाने रेकॉर्ड केले व स्पीकर ऑन करून अधिकाऱ्याला बोलायला लावले आणि तो कॉल वायरल गेला जन्मसात एका आयपीएस अधिकाऱ्याची प्रतिमा मलीन झाली त्यासोबत तहसीलदारच्या अंगावर जाण्याचा प्रकारही झाला प्रांताधिकारी उपस्थित असताना तलाठ्याला मारहाण झाली. या प्रश्नावर जनशक्ती शेतकरी संघटनेचे अतुल खूपसे यांनी आवाज उठवला. यावेळी आरोप पत्यारोप झाले.




अखेर त्या गुंडावर गुन्हा दाखल करण्यात आला परंतु अजितदादा पवार यांनी माफी मागावी या प्रश्नावर जनशक्ती संघटना ठाम असून अधिकाऱ्यांची मनधुर्य खचूने म्हणून जनशक्ती शेतकरी संघटनेच्या वतीने करमाळ्याच्या कमला भवानी मंदिरात अभिषेक करून आरती करण्यात आली आणि त्यानंतर जनशक्ती शेतकरी संघटनेच्या वतीने आयपीएस अंजली कृष्णा यांच्या फोटोला दुग्धाभिषेक घालण्यात आला यावेळी बोलताना अतुल खूपसे पाटील म्हणाली की अधिकाऱ्यांचे खच्चीकरण करण्यासाठी आणि आपल्या कार्यकर्त्यांना खुश करण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांनी कॉल केला त्यामुळे अधिकाऱ्याला भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अंजना कृष्ण आहे केरळ राज्यातील आहेत आपल्या तीन मुलगी केरळमध्ये जाऊन नोकरी करत असेल सेवा करत असेल आणि तेथील उपमुख्यमंत्री तिला दमबाजी करत असेल तर आपल्याला किती वाईट वाटेल म्हणून अजित दादांनी त्या लाडक्या बहिणीचे माफी मागावी आणि त्यांचे मनोदरीय खचने म्हणून जनशक्ती संघटनेच्या वतीने तुळजाभवानी मातेच्या मंदिरात पूजा घालून ज्या आयपीएस अधिकाऱ्याच्या नावातच अंजन आहे म्हणजे मारुतीरायांच्या आईचं नाव आहे आणि जिच्या आडनावात कृष्ण आहे असे अधिकारी वाईट कशी असू शकते असा भावनिक प्रश्न खूपसे पाटील यांनी केला व पुढे बोलताना आज आम्ही या अधिकाऱ्याला सपोर्ट करण्यासाठी दुग्धाभिषेक घातला आहे यावेळी गणेश भानवसे बालाजी तरंगे शरद कर्डे किशोर शिंदे काका दरगुडे वैभव मस्के निलेश पवार साहेबराव विटकर हनुमंत कांतोंडे सागर महाराज असे अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर; श्री गणेश विसर्जन मोठ्या उत्साहात संपन्न

## सवाद्य मोठ्या थाटामाटात पारंपारिक पद्धतीने विसर्जन मिरवणूक





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : अनंत चतुर्दशी दि.०६ सप्टेंबर रोजी श्री गणपती विसर्जन मिरवणूक उत्साहात संपन्न झाली. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथील श्री विठ्ठल सभा मंडप येथे प्राणप्रतिष्ठापना करण्यात आलेल्या श्री गणपती मूर्तीची विधिवत पूजा सकाळी ९.०० वाजता मंदिर समितीचे सदस्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता श्री संत नामदेव पायरी पासून श्री गणपतीची विसर्जन मिरवणूक नगर प्रदक्षिणा मार्गाने संवाद्य मोठ्या थाटामाटात पारंपारिक पद्धतीने काढण्यात आली भक्तिमय वाता- वरणात बाप्पाला निरोप दिला.

अबदागिरी निशाने ढोल, वारकरी दिंडी, वैजापूर बँड, लेझीम, संबळ, मर्दानी खेळ, स्थानिक बँड अशा लवाजमा यासह मोठ्या थाटामाटात निघाली. त्यावेळी मंदिर समितीचे सदस्य अतुलशास्त्री भगरे गुरुजी, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, विभाग प्रमुख संजय कोकीळ, कर्मचारी वृंद यांनी विसर्जन सोहळा मिरवणूक शिस्तबद्ध व नियोजन पूर्वक पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. त्याचप्रमाणे श्री गणपती मूर्ती (शाडूची ) पर्यावरण पूरक असूनही नदीपात्रात विसर्जन न करता नगरपालिकेच्या संकलन केंद्रामध्ये जमा करण्यात आली.

# बोळेगाव येथे सातव्या दिवशी गणरायाचे विसर्जन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी एस.के. गायकवाड : बोळेगाव ता.तुळजापूर येथे श्री गणेश मित्र मंडळाच्या वतीने बसविण्यात आलेल्या गणेश मुर्तीचे सातव्या दिवसी वाजात गाजत मोठ्या उत्साही वातावरणात विसर्जण करून गणती बाप्पा मोरय्या पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष करित गणरायाला निरोप देण्यात आला.



तुळजापूर तालूक्यातील मौजे बोळेगाव येथे एक गाव एक गणती हा उपक्रम राबवित येथिल श्री गणेश मित्र मंडळाच्या वतीने गणेश चतुर्थीला गावातील मुख्य चौकात गणेश मुर्तीची स्थापना करून विविध उपक्रमाने गणेश उत्सव साजरा करण्यात आला.

सात दिवसाच्या कालावधिमध्ये दररोज सकाळ संध्याकाळ गावातील प्रातिष्ठीत मान्यवरांच्या हस्ते आरती करून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविण्यात आले.गणेश उत्सव निमित्तने महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले होते.

शेवटी सातव्या दिवसी सरपंच विलास पाटील यांच्या हस्ते गावातील मान्यवारांच्या प्रमुख उपस्थित गणेश मुर्तीचे पूजन व आरती करून सहवाद्द भव्य विसर्जन मीरवणूक काढून गणरायाला निरोप देण्यात आला. या प्रसंगी लहान मुला मुलींनी विविध गाण्यावर सुंदर नृत्य सादर करून ग्रामस्थ भाविकभक्तांची मने जिंकली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष भावेश लिंबाजी मदने, अमर रुपनूर,राजेंद्र रूपनूर,अभिषक सुर्यवंशी, गौरव सुर्यवंशी, श्रीमंत सुतार, परमेश्वर पोतदार,गणेश गायकवाड,चिमाजी रुपनूर, संगीता सुरवसे सह ग्रामस्थ महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होतो.

# शिक्षकांना योग्य सन्मान देणे हे आपले सर्वांचे कर्तव्य : शिक्षण अधिकारी कादर शेख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर प्रतिनिधी

शिक्षक हे फक्त अभ्यास शिकवणारे नसतात तर ते समाजाचे मार्गदर्शक असतात. त्यांच्या योग दिनाशिवाय कोणतीही प्रगती होऊ शकत नाही. त्यामुळे शिक्षकांना योग्य सन्मान देणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. असे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर्शक यांनी दिले.

उपक्रम गणपती थारू पवार(जिल्हा परिषद कन्नड मुलींची शाळा दुधनी तालुका अक्कलकोट) महदूद नवाज अब्दुल मजीद जागीरदार(जिल्हा परिषद उर्दू शाळा मंद्रूप तालुका दक्षिण सोलापूर) लक्ष्मण सुखदेव उकिरडे जिल्हा परिषद शाळा सोमनाथ नगर, सौ वैशाली संजय निलगिरी(लक्ष्मीबाई किर्लोस्कर मराठी शाळा) या शिक्षकांच्या घरी जाऊन त्यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.

शाळेत होणारी कार्यक्रम मंचावर होणारा सन्मान हे चित्र डोळ्यासमोर येत आहे मात्र यंदा सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी या चौकटी बाहेर जाऊन एक वेगळा रुदय फरशी उपक्रम राबवला त्यांनी शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांच्या घरी जाऊन व त्यांना शाल गुलाब पुष्प श्रीफळ व पुस्तके देऊन सन्मानित करण्यात आले. व शिक्षकांचा खरा खरा आदर दिन बनवला.

**शिक्षण दिनानिमित्त प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्याचा आगळावेगळा उपक्रम**

# मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**थोडक्यात...**

## मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ६ सप्टेंबर रोजी दुपारी मराठा वस्ती चौक येथे घडली. याप्रकरणी आरती अजय कदम (वय-२३,रा.मराठा वस्ती,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दिलीप राजाराम बाबर (वय-५२,रा. होमकर नगर,भवानी पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. माहिती अशी की, फिर्यादी यांचा मुलगा यश अजय कदम (वय-६) हा गणपती बघून घरी येत असताना वरील संशयित आरोपी याने त्याच्या ताब्यातील तीन चाकी मालवाहतूक अॅपे रिक्षा क्रमांक एमएच.१३.सीटी.९०९७ ही निष्काळजीपणाने व अविचाराने चालवून फिर्यादी यांच्या मुलास समोरून धडक दिल्याने त्याच्या छातीस, पायास गंभीर दुखापत होऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल वाडेकर हे करीत आहेत.

## अज्ञात चोरट्याने घरातून मोबाईल पळवला

सोलापूर : अज्ञात चोरट्याने घराच्या उघड्या दरवाजातून प्रवेश करून हॉलमधील खिडकीमध्ये ठेवलेला चाळीस हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी रात्री नऊ ते सव्वा नऊच्या सुमारास न्यू बुधवार पेठ रमापती चौक येथे घडली.याप्रकरणी सफल सारंग क्षीरसागर (वय-३२,रा.न्यू बुधवार पेठ,रमापती चौक) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहेत.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार लोहार हे करीत आहेत.

## एमआयडीसी परिसरातून दुचाकीची चोरी

सोलापूर : शहरातील नई जिंदगी परिसरातून होंडा कंपनीची एच.एफ.डिलक्स मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. फिर्यादी मोहम्मद अब्दुलसत्तार मालदार (वय-३८,रा.नई जिंदगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,दि.१ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजता ते २ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंतच्या दरम्यान त्यांची काळ्या रंगाची मोटारसायकल (क्र.एम. एच.१३.सी.वाय.०५६३) हँडल लॉक करून पार्क केली होती.दरम्यान अज्ञात चोरट्याने मोटारसायकल चोरून नेली.या चोरीचा एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून,अज्ञात चोरट्याचा शोध सुरू आहे.

# श्री. गणेश उत्सवानिमित्त रामसेतू फाउंडेशन तर्फे विविध स्पर्धांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : काल दि.६ सप्टेंबर २०२५ रोजी श्री. गणेश उत्सवानिमित्त रामसेतू फाउंडेशन तर्फे आणि युवती-सेना राज्य कार्यकरणी सदस्य प्रियांकाताई परांडे सोला-पूर यांच्या माध्यमातून टाकळी सिकंदर(मोहोळ)या ठिकाणी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी गृहराज्यमंत्री श्री सिद्धारामजी म्हेत्रे साहेब,सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश नाना साठे,महिला सक्षमीकरण राज्य प्रमुख आणि महिला आघाडी संपर्क प्रमुख सौ.अनिताताई माळगे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. लहान गटामध्ये चित्रकला स्पर्धा,मेहंदी स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा ,खुल्या गटासाठी मेहंदी स्पर्धा, आणि रांगोळी स्पर्धा तसेच महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. लहान गट आणि खुला गट अशा पद्धतीने युवती-महिला आणि विद्यार्थी यांच्यासाठी कलागुनांना वाव मिळावा म्हणून प्रियांकाताई यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या स्पर्धेमध्ये एकूण १६० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.पहिले ३ क्रमांक यांना बक्षीस स्वरूपात रक्कम देण्यात आली आणि मानाची ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला तसेच सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी महिलांसाठी खास हळदी कुंकू समारंभ आयोजित केला होता.यावेळी महिला सक्षमीकरण साठी सौ अनिताताई माळगे मॅडम यांनी महिलांना स्वतःचा रोजगार निर्माण करण्यासाठी आणि स्वयंसिद्ध बनण्यासाठी बहुमोल मार्गदर्शन केले.

तसेच सर्वच मान्यवर यांनी आपले बहुमोल मार्गदर्शन केले.



यावेळी शिवसेना पदाधिकारी सौ. उषाताई मुळे,युवतीसेना मोहोळ विधानसभा प्रमुख सौ.स्नेहा चवरे,युवा सेना मो-होळ गणेश जाधव,युवासेना तालुका प्रमुख महादेव भोसले,संग्राम चव्हाण सर,राजीव गांधी माध्यमिक विद्यालय संचालक मा.श्री .वीरसेन देशमुख, ग्रा.पं. सदस्य फुलचिंचोली मा.नारायण आबा गायकवाड श्री. सागर सलगर पुळुजवाडी श्री. अजिंक्य सपाटे तारापूर ,माजी नगरसेवक गणेशदास परदेशी,छगन पवार,बाळासाहेब बोबडे,संतोष परांडे,विश्वास वसेकर,शुभम मुळे,नारायण मुळे,आकाश गाडे,प्रमोद बाबर,दत्ता पांढरे व इतर सर्व मान्यवर मंडळी ,पालक ,ग्रामस्थ ,स्पर्धक परीक्षक, निरीक्षक उपस्थित होते.हळदी कुंकवाच्या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व सुवासिनी स्त्रियांना भेटवस्तू देऊन सन्मानित केले गेले .कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इंजिनीयर प्रियांका (ताई) परांडे यांनी केले.

**नंगपुरामुर्री निवासी शाळेत शिक्षकदिन साजरा**

**स्वयंशासन उपक्रम व सर्वपल्ली यांची जयंती साजरी**

# आवडीचे शिक्षक बनून विद्यार्थ्यांनी उद्याचे भविष्य आरंभिले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/ गोंदिया :

'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जो प्राशन करेल तो गुरगुरणार' हे तेवढेच खरे आहे. शिक्षण माणसाचा तीसरा डोळा आहे. शिक्षणाशिवाय मानवाचा उध्दार नाही. म्हणून प्रत्येकाला भारतीय संविधानानुसार शिक्षणाचा हक्क आहे. तो सर्वांनी घ्यावा. उच्चशिक्षित बनावे. तर जीवनाला आकार मिळतो. हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आवडीचे शिक्षक बनून विद्यार्थ्यांनी उद्याचे भविष्य आरंभिले. हे गरजेचे आहे.

गोंदिया तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी केली. मंचावर शिक्षकांची भूमिका साकारणारे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. अभिवादन करून शिक्षक झालेले विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी शाळेत स्वयंशासन उपक्रम राबविला. यामध्ये मुख्याध्यापक म्हणून डेव्हिड जांभूळकर, गृहपाल सुशांत वालदे मानव गोंधूळे, समीर खोब्रागडे, आदर्श तिरपुडे, रेयांश वालदे, समंथ भोवते, आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यशस्वी केला.

**आवडीच्या अभ्यासक्रम शिकविला** : विद्यार्थ्यांना आवडणारा पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम शिकवून शालेय विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. वाणी, स्वर, वाचनाची गोडी, अशा सर्वप्रकारे आदर्श शिक्षकांची लक्षणे अंगीकृत करून शिक्षण दिले.

या उपक्रमाचे मुल्यमापन करण्यासाठी आशिष शहारे, मुन्नाभाई नंदागवळी, साधना पारधी, नीता भलमे, प्रदीप ढवळे, पी. ए. लांजेवार, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर यांचा समावेश होता.



# आज आमदार अभिजीत पाटील यांच्या वतीने जनता दरबार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सोमवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी आमदार अभिजीत पाटील यांच्या वतीने पंचायत समिती येथील सभागृहात दुपारी चार वाजता जनता दरबाराची आयोजन करण्यात आले आहे. यासाठी नागरिकांनी लवकरच शासकीय बँक कर्ज प्रकरणाविषयी कोणत्या तक्रारी आहे त्यामुळे नागरिकांनी शेतकरी त्रस्त झाले असून याची दखल घेऊन आमदार अमित पाटील यांनी सोमवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी पंचायत समिती येथे दुपारी चार वाजता जनता दरबाराची आयोजन केले आहे या जनता दरबारामध्ये सहकार्य व शासकीय बँकेबाबत कर्ज प्रकरणाविषयी काही अडचणी असल्यास त्याबाबत नागरिकांना जनता दरबारात उपस्थित राहून तक्रारी दाखल कराव्यात असे आव्हान करण्यात आले आहे आमदार अरविंद पाटील यांनी जनता दरबार ची आयोजन करून नागरिकांच्या खाडी अडचणी जाणून घेण्यासाठी सुरुवात केली आहे.

# यशस्वी व्हायचे असेल तर सरावात सातत्य आवश्यक

## 'एमएसबीटीई'चे माजी संचालक डॉ. प्रकाश खोडके; स्वेरी मध्ये 'शिक्षक दिन' उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'जर आपल्याला जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर आपण ज्या गोष्टींचा सराव करत असता त्याच्यात सातत्य जपले पाहिजे. आपण कुठे चुकतो हे सरावातून समजते आणि ते दुरुस्त करता येते. यातून मिळणारे यश हे पूर्णपणे तुमच्या कृतीवर अवलंबून असते. तुम्ही काय विचार करता, तुम्ही वेळप्रसंगी काय निर्णय घेता, तुम्हाला काय वाटते यावर आपल्या कार्याची दिशा अवलंबून असते. कारण आपले मन म्हणजे एक कारखाना आहे. ज्यामध्ये अनंत विचारांची प्रक्रिया चालते.' असे प्रतिपादन एमएसबीटीई चे माजी संचालक डॉ प्रकाश खोडके यांनी केले.





गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट मध्ये मध्यवर्ती असलेल्या भव्य खुल्या रंगमंचावर भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची १३७ वी जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजिलेल्या 'शिक्षक दिना'च्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून एमएसबीटीई चे माजी संचालक डॉ प्रकाश खोडके हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वेरीचे माजी अध्यक्ष व जेष्ठ विश्वस्त दादासाहेब रोंगे हे होते. महाराष्ट्र गीत आणि स्वेरीच्या सुमधुर गीताने व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरवात झाली. प्रास्ताविकात संस्थेचे युवा सचिव डॉ.सुरज रोंगे म्हणाले की, 'स्वेरीची संस्कृती ही 'गीव्ह रिस्पेक्ट अँड टेक रिस्पेक्ट' यावर आधारित आहे. यात कुठेही अंतर रहात असल्याचे दिसून येत नाही. याच आदरयुक्त संस्कारामुळे स्वेरीची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.' स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सर्वांचे स्वागत करून स्वेरीची ओळख करून दिली. ते म्हणाले की 'मनुष्य हा आयुष्यभर विद्यार्थी असतो. त्यामुळे प्रत्येक क्षणी तो शिक्षण घेत असतो. हे करत असताना विद्यार्थ्यांनी आपला आत्मविश्वास वाढविला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अनेक सल्ल्यामुळे स्वेरीची प्रगती झाली आहे.' असे सांगून त्यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध घडामोडीवर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'आपल्या नजरेतून दृष्टीकोन ठरत असतो त्यामुळे आपली दृष्टी चौकस असली पाहिजे. विद्यार्थी दशेत शिस्त महत्वाची आहे कारण स्वयंप्रकाशित होण्यासाठी शिस्त महत्वाची भूमिका बजावते.' असे सांगून समुद्रातील जहाजाचे उदाहरण दिले. यावेळी प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्यासह चारही महाविद्यालयांतील प्राचार्यांचा व गुणवंत शिक्षकांचा 'शिक्षक दिना' निमित्त पाहुण्यांच्या व विद्यार्थ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी विश्वस्त एच .एम.बागल, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार, संस्थेअंतर्गत असलेल्या डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम. जी.मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.एस.व्ही.मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी सोनाली करवीर, इतर महाविद्यालयांचे प्रतिनिधी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. साक्षी भंडारे, तनिशा लांडगे व प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थिनी सचिवा स्नेहा झिरपे यांनी आभार मानले.

## दुसरबिड येथे इस्लाम धर्माचे प्रेषित मोहंमद पैगंबर जयंती उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

इस्लाम धर्माचे प्रेषित व मानवतेचे पुरस्कर्ते मुहम्मद पैगंबर यांची जयंती दुसरबिड येथे ५ सप्टेंबर रोजी हर्षोल्लासात साजरी करण्यात आली. या निमित्त शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीत पारंपरिक पोषाख परिधान करून, हातातील ध्वज फडकावत मुस्लिम समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सर्वधर्मियांनीही या उत्सवात सहभागी होत मुस्लिम समाजबांधवांचे मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी स्वागत करुन सामाजिक एकोपा जपला. पोलिस प्रशासनाच्या हाकेला ओ देत दुसरबिड शहरात मुस्लिम समाजबांधवांनी स्वयंस्फूर्तीने मिरवणूक सकाळ पासून सायंकाळ पर्यंत महंमद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त औचित्य साधून शहरातून शूक्रवारी भव्य मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी मिरवणुकीत सहभागी समाजबांधवांना समाजातील समाज बांधवांच्या वतीने. सकाळी सात ते नऊ वाजेपर्यंत पोहा. आकरा ते एक पासून मज्जीद मध्ये जेवणाची व्यवस्था. तिन वाजेपासून ते सात वाजेपर्यंत जल्लूश काढण्यात आले दादा मियां मज्जिद मध्ये फात्तिया खानी व खिर वाटप करण्यात आली.. या उत्सवात मुस्लिम समाजबांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. यात लहान मुलांचीही उपस्थिती होती. , समस्त गावकरी व समाज बांधव.मुस्लीम युनायटेड च्या वतीने मोलाचे सहकार्य करून. परीश्रम घेण्यात आले



## गणरायाच्या दर्शनावरून मुंबई-नाशिक महामार्गाने परतणाऱ्या बापलेकीचा भीषण अपघातात जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

गणरायाचं दर्शन घेऊन मुंबई नाशिक महामार्गाने दुचाकी वरून घरी जात असताना बाप लेकीच्या ट्रॅक ने धडक दिल्याने झालेल्या दुर्दैवी अपघातात बाप लेकीचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना भिवंडी तालुक्यातील डोहळे गावाच्या हद्दीत मुंबई नाशिक महामार्गावर घडली आहे. या अपघात प्रकरणी पडघा पोलिस ठाण्यात नोद करून पोलिसांनी तपास सुरु केल आहे.राजेश अधिकारी ( वय ३९) व वेदिका अधिकारी ( वय ११ रा.सरळांबे, ता.शहापूर) असे भीषण अपघातात मयत बापलेकीचे नावे आहेत .

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,मयत राजेश अधिकारी आपली मुलगी वेदिका सोबत दुचाकी वरून भिवंडी तालुक्यातील सापे गावात नातेवाईकांकडे गणपती दर्शनासाठी शुक्रवारी दुपारच्या सुमारास आले होते. गणरायाच्या दर्शनानंतर शहापूर तालुक्यातील सरळांबे येथील घरी सायंकाळच्या सुमारास दुचाकीवर बसून परतत असताना भिवंडी तालुक्यातील डोहळे गावाच्या हद्दीत मुंबई नाशिक महामार्गावर साई लॉजेस्टिक समोर शहापूरच्या दिशेने जात असताना पाठीमागून येणाऱ्या भरधाव ट्रकने जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात या बापलेकीचा दुर्दैव अंत झाला आहे. या अपघाताच्या वृत्त समजल्यानंतर शहापूर तालुक्यातील सरळांबे गावात गणेशोत्सव काळात शोककळा पसरली आहे. या अपघातात स्थानिकांच्या मदतीने पडघा पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदना साठी पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते. तर या अपघाताच्या घटनेचा अधिक तपास पडघा पोलिस करीत असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी दिली आहे.

## स्नेहालय स्कूल येथे शिक्षक दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त पाच सप्टेंबर रोजी सर्वत्र शिक्षण दिन साजरा केला जातो. त्याचप्रमाणे स्नेहालय न्यू मुली स्कूल रोशेवाडी येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम शाळेच्या मुख्याध्यापिका धनश्री दळवी यांनी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यानंतर स्कूल मधील सर्व विद्यार्थ्यांनी फुल तसेच भेटवस्तू देऊन तसेच सुंदर असे ग्रीटिंग कार्ड बनवून शिक्षण प्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी काही विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी विद्यार्थी शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. व तसेच मुख्याध्यापिका धनश्री दळवी यांनी मार्गदर्शन केले.

## प्रवीण बागड़े यांना प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर /प्रतिनिधी :

साहित्याच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा जागृत ठेवणाऱ्या आणि विचारांची नवी दिशा देणाऱ्या साहित्यिकांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी दिला जाणारा 'प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार' यंदा नागपूरचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रवीण बागडे यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी लेखनामुळे हा सन्मान त्यांना बहाल करण्यात आला आहे. प्रवीण बागडे हे गेली अनेक वर्षे मराठी साहित्य क्षेत्रात सक्रिय आहेत. वृत्तपत्रीय संपादकीय, सामाजिक जाणीव जागवणारे लेख, निवडणूक प्रक्रियेतले वास्तव, धार्मिक-सांस्कृतिक घडामोडींवरील संपादकीय शैलीतील विवेचन अशा विविध माध्यमांतून त्यांनी मराठी वाचकवर्गाला विचारप्रवण साहित्य दिले आहे. त्यांच्या लेखनशैलीत वास्तवाशी प्रामाणिकपणा, मुद्देसूद मांडणी आणि जनसामान्यांच्या समस्यांवरील स्पष्ट दृष्टिकोन यांचा समन्वय दिसून येतो. साहित्य रत्न पुरस्कारासोबत मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख रकमेचा समावेश आहे. आंबेडकरी चळवळीचा आवाज दैनिक प्रबुद्ध परिवार, नांदेड वृत्तपत्राचा १६ व्या वर्धापन दिनी होणाऱ्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रवीण बागडे यांना प्रदान करण्यात येणार असून साहित्यविश्वात आणि वाचकवर्गात त्यांच्या सन्मानाबद्दल उत्साहाचे वातावरण आहे. या घोषणेनंतर नागपूरसह विदर्भातील साहित्यिक वर्तुळातून मोठ्या प्रमाणावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अनेकांनी त्यांच्या लेखनाला सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवणारे असे संबोधले आहे. तसेच प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार प्रवीण बागडे यांना मिळाल्याने मराठी साहित्य क्षेत्राचा गौरव वाढल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.



यापूर्वी सुध्दा विद्यापीठात त्यांच्या उल्लेखनीय कार्य, उत्साह आणि निष्ठेसाठी 'उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार', 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार', राज्य शासनाचा अहवाल तयार करणेकरीता सक्रिय सहभागासाठी 'लम्पी योद्धा पुरस्कार' आणि नुकतेच देशभर राबविण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अभियानाचा विद्यापीठ अहवाल तयार करणेकरीता सक्रिय सहभागासाठी 'विकसित कृषी संकल्प अभियान २०२५' पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या लागोपाठ यशस्वी प्रयत्नांचे फार कौतुक केले जाते. ते महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांकडे स्वीय सहाय्यक म्हणुन कार्यरत होते. शासन आणि प्रशासनाच्या अनुभवासोबतच त्यांना समाजसेवा आणि साहित्याचीही आवड आहे. त्यांनी कोविड अंतर्गत अनेक रुग्णांची सेवा सुध्दा केली आहे. तसेच त्यांचे महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर ३५० वर लेख तसेच १०० वर मुलाखती/स्तंभ सुध्दा प्रकाशित झाले आहेत. या पुरस्काराबद्दल त्यांचे अनेक स्तरावरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

## अनंत चतुर्दशी निमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : अनंत चतुर्दशी निमित्त श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचा कंगनजोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, मारवाडी पेट्याचा हार, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, मोहरांची माळ, तुळशीची माळ, नाम निळाचा, अनंताचा दागिना तसेच श्री रूक्मिणीमातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते.

## बसचालक व वाहकामुळे बसमधील प्रवशाचे वाचले प्राण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : डॉ. विनायक गायकवाड

पुरंदर: हडपसर आगाराची जेजुरी मार्गे नंबर २१० या बसमध्ये चालक, सहप्रवासी व वाहकाच्या सतर्कतेमुळे एका प्रवाशाचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. ही घटना गुरुवारी (दि. ४) घडली.



जेजुरीवरून नेहमीप्रमाणे बस नं २१० ही हडपसरला निघाली होती. ही बस पवारवाडीजवळ येताच मुंढवा येथील प्रवासी शामराव जाधव यांना अस्वस्थ वाटू लागले. पुढे हा त्रास वाढू लागला. प्रवाशाला चक्कर येऊन ते बेशुद्ध झाले. त्यांना त्या वेळी हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती शांताराम झेंडे या प्रवाशाने चालक व वाहक यांना सांगितले. तसेच जवळच डॉ. अतुल जाधव यांचे साई सिद्धी हॉस्पिटल, काळेवाडी (दिवे )येथे असल्याचाही माहिती दिली.

त्यानुसार बसचालक मच्छिंद्र कुंभार व बसवाहक सागर पाटील (गुरव) यांनी तातडीने बस रुग्णालयाकडे नेली. त्यांना काळेवाडी येथील अरुंद रस्ता आणि गणेशोत्सवाच्या गर्दीचा सामना करावा लागला. रुग्णालयात दाखल करताच डॉ. जाधव यांनीही वेळ न दवडता प्रवाशी शामराव जाधव यांच्यावर उपचार सुरू केले.

छातीवर पंपींग करत जाधव यांना शुद्धीवर आणले, प्रवाशी जाधव यांची प्रकृती स्थिर झाले नंतर सोपानदेव हॉस्पिटल सासवड येथे पाठवण्यात आले असल्याची माहिती डॉ. अतुल जाधव यांनी दिली.पुढील उपचारासाठी त्यांना पुणे येथे नेण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे नातेवाईक यांच्याकडून सांगण्यात आले आहे.बसचालक मच्छिंद्र कुंभार व वाहक सागर पाटील (गुरव)यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

### शरद शेजवळ यांची केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना निवेदनाद्वारे मागणी

# दादर रेल्वेस्थानकाचे चैत्यभूमीसह नाशिकरोड-परिवर्तनभूमी, येवला-मुक्तीभूमी, मनमाड -प्रेरणाभूमी असे नामकरण करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

येवला/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई-दादर रेल्वे स्टेशनचे नामकरण चैत्यभूमी रेल्वे स्टेशन असे करून नाशिकरोड परिवर्तन भूमी व जिल्ह्यातील मनमाड रेल्वे स्टेशनाला प्रेरणाभूमी रेल्वे स्टेशन मनमाड व येवला रेल्वे स्टेशनचे नामकरण मुक्तीभूमी रेल्वे स्टेशन नामकरण करावे अशी मागणी मुक्ती महोत्सव समितीचे निमंत्रक,प्रवर्तक प्रा.शरद शेजवळ यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला जिल्हा नाशिक येथे 'मुंबई इलाका दलित वर्ग परिषद' संपन्न झाली व मी कोणत्या धर्मात जन्मास यावं हे माझ्या हातात नव्हतं पण कोणत्या धर्मात मरावं हे मात्र माझ्या हातात आहे असे म्हणत मानवतेच्या हक्क-अधिकारासह,धर्म स्वातंत्र्याची हाक दिली.बाबासाहेबानी ज्या ठिकाणी हि ऐतिहासिक मुक्तीची गर्जना केली ती भूमी मुक्तीभूमी म्हणून ओळखली जाते. म्हणून येवला येथील रेल्वेस्थानकास मुक्तीभूमी रेल्वे स्टेशन असे नांव देण्यात यावे. तसेच सन १९३८ ते १९५१ दरम्यान भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील देशाचे कायदामंत्री तथा स्वतंत्र भारताचे भारतीय संविधान निर्माता, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनमाड (महाराष्ट्र राज्य) शहरात मानवमुक्तीच्या आंदोलना निमित्ताने वेगवेगळ्या कारणासाठी मनमाड शहरात येत.

डॉ.आंबेडकर विद्यार्थी आश्रम वसतिगृह मनमाड स्थापना-भूमिपूजन-अनावरण कार्यक्रमासह सन १९३८ मुंबई इलाका युवक परिषद,अस्पृश्य महिला-सबलीकरण परिषद,दलित कामगार परिषद,सन १९४९ मुंबई इमारत फंड सभा,सन १७ नोव्हेंबर १९५१ डॉ.आंबेडकर विद्यार्थी आश्रम वसतिगृह मनमाडची स्थापना-भूमिपूजन-अनावरण प्रसंगी उपस्थित राहून भारतीय विद्यार्थी, महिला,कामगार यांना प्रेरणा दिली. सन ६ डिसेंबर १९५६ दिनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पार्थिव दादर (मुंबई) येथे अग्नीदाग अंत्यसंस्कार केले गेले.ते स्थान-भूमी चैत्यभूमी नांवाने से जगभर ओळखली जाते.

जगभरातील मानवतावादी, आंबेडकरवादी जनतेच्या भावना लक्षात घेऊन.दादर (मुंबई) रेल्वेस्थानकाचे चैत्यभूमी,येवला- मुक्तीभूमी व मनमाड - प्रेरणाभूमी असे नामकरण करण्यात यावे अशी मागणी मुक्ती महोत्सव समितीचे निमंत्रक,प्रवर्तक प्रा.शरद शेजवळ यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी निवेदनाद्वारे केली आहे.